महाराष्ट्र टाइम्स नागपूर । गुरुवार, ६ एप्रिल २०२३

# आयआयएम देणार २३३ विद्यार्थ्यांना पदव्या

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

## शनिवारी सातवा दीक्षांत समारंभ



इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंटच्या सातव्या दीक्षांत सोहळ्याचे आयोजन येत्या शनिवारी, ८ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. या सोहळ्यात एकूण २३३ विद्यार्थ्यांना एमबीएची पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

आयआयएम, नागपूर येथे दोन वर्षांचा एमबीए अभ्यासक्रम चालविण्यात येतो. यंदाच्या वर्षी २०२१-२३ या बॅचच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. ८ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता मिहान कॅम्पसमध्ये दीक्षांत सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

एचसीएलचे संस्थापक आणि एपिक फाउंडेशनचे अध्यक्ष अजय चौधरी आणि ओयो रूम्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रितेश अग्रवाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. नागपूर आयआयएमच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष आणि टेक महिंद्राचे व्यवस्थापकीय संचालक सी. पी. गुरनानी, नागपूर आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री आणि इतर संचालकही यावेळी उपस्थित राहतील. दीक्षांत समारंभाच्या आदल्या दिवशी गुणवंत विद्यार्थ्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येईल.

नागपूर आयआयएमला २०१५मध्ये प्रारंभ झाला. अहमदाबाद येथील आयआयएमच्या मार्गदर्शनात नागपुरातील संस्था काम करीत आहे. नोव्हेंबर, २०२१मध्ये मिहान येथील १३२ एकराच्या परिसरात आयआयएम स्थानांतरित करण्यात आले. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते या नव्या परिसराचे उद्‌घाटन करण्यात आले होते. या परिसरात भव्य इमारती आणि अनेकविध सुविधा तयार करण्यात आल्या आहेत. नियमित एमबीए, कार्यरत व्यावसायिकांसाठी एमबीए आणि पीएच.डी. असे अभ्यासक्रम नागपूर आयआयएम येथे चालविण्यात येतात.